# अनोखे दातृत्त्व

**सौ. मीना गरीबे, अकोला**

कार्यालयातील घड्याळात टण टण करीत दहा ठोके निनादले तसा नेमलालजींनी हातातला पेन बाजूला ठेवला. डोळ्यांवरचा चष्मा काढला. सगळे पैसे मोजून व्यवस्थित रबरात बांधून संस्थानच्या तिजोरीत टाकले. ते पैसे मोजताना नेमलालजींच्या डोळ्यासमोर मनोजचा उत्सुक चेहरा तरळला. 'काढाव्यात का यातल्या काही नोटा? आपल्या जवळ जमले की परत टाकून देऊ' असा विचारही त्यांच्या मनात आला. पण दुसऱ्याच क्षणी नेमलालजींचे पापभिरु मन चपापले. 'छे ! छे ! संस्थानच्या पैशाला हात लावण्याचा विचारही आपल्या मनात कसा आला?' ते जणू स्वतःशीच बोलले.

त्यांनी तिजोरीला कुलूप लावले, सगळ्या वही-खतावण्या एकावर एक रचून बाजूला ठेवल्या. 'अरिहंत-सिद्ध ' असा तोंडाने जप करीत नेमलालजी उठले. कार्यालय बंद केले आणि जवळच असलेल्या धर्मशाळेतील आपल्या खोलीकडे चालू लागले.

धर्मशाळेत सर्वत्र सामसूम झाले होते. संस्थानच्या गेटबाहेर मात्र थोडी जाग दिसत होती. नवीन मंदिराच्या बांधकामासाठी कुशल कारागीर, शिल्पी राजस्थानातून आले होते. गेट बाहेर त्यांनी त्यांच्या झोपड्या उभारल्या होत्या. पावसाळ्याचे दिवस होते. पावसाची रिपरिप सुरूच होती. दोन तासापूर्वीच यात्रेकरुंच्या दोन गाड्या नागपूरहून आल्या होत्या. त्यांची सगळी सोय करुन देऊन संस्थानचा कर्मचारी वर्ग आपआपल्या खोल्यांमध्ये परतला होता. यात्रेकरुंनीही सामान जिथल्या तिथे करुन, उद्याच्या वंदनेची तयारी करुन झोपेची आराधना आरंभली होती.

नेमलालजी हलकेच दार लोटून खोलीत शिरले. मनोरमाबाई झोपल्या होत्या. मनोज तन्मयतेने अभ्यास करीत होता. नेमलालजींचे मन मायेने भरुन आले. आवाज न करताच ते मागच्या खोलीत गेले. धर्मशाळेतील समोरच्या खोलीला जोडून असलेल्या या छोट्या खोलीचा उपयोग स्वयंपाकासाठी होत होता. स्वयंपाकघरात शेगडीवर दुधाचा गंज होता. नेमलालजींनी एका पेल्यात दूध घेतले. त्यात थोडी साखर घातली आणि चमच्याने ढवळत पेला मनोजला आणून दिला.

'बाबा !'

''अरे घे ! अभ्यास करायचाय नं तुला? आणि आता बहुधा कोणी यात्रेकरु येणार नाहीत पावसाचे.''

एकवार मनोजच्या डोक्यावरुन प्रेमाने हात फिरवित नेमलालजी आपल्या बिछान्यावर जाऊन बसले. त्यांनी पद्मासन घातले, डोळे मिटले, मनातील सर्व विकल्प दूर केले. त्यांच्या अंतःचक्षूपुढे पहाडावरील मंदिरातील पार्श्वनाथ स्वामींची मनोज्ञ मूर्ती तरळू लागली. नकळत त्यांचे हात जोडल्या गेले. मनोमन त्या मूर्तीला त्रिवार नमस्कार करत नेमलालजी म्हणू लागले,

'सर्पाधिराजा कमठारितोयै
    ध्यानस्थितस्यैव फणावितानै
यस्यापसर्ग निरवर्तयत्तं
    नमामि पार्श्वं महतादरेण'

त्रिवार नमस्कार करुन झाल्यावर त्यांनी बिछान्यावर अंग टाकले. आणि झोपेची आराधना करु लागले. डोळे बंद होताक्षणीच मात्र मनात विचारांचे थैमान उभे राहिले. आजचाही दिवस तसाच गेला होता. आज पण पैशाची काहीच सोय होऊ शकली नव्हती. 'आता उद्या तरी?' नेमलालजींनी आपल्याच मनाला प्रश्न केला.

मनोज नेमलालजींचा सगळ्यात मोठा मुलगा. मनोज हुषार तर होताच पण अभ्यासूही होता. या आडबाजूला असलेल्या तीर्थक्षेत्रावर शाळेची काहीच सोय नव्हती. पण मनोजची शिक्षणाची आवड लक्षात घेऊन नेमलालजींनी त्याला जवळच्या शहरात शाळेत घातले होते. मनोजही न कंटाळता सायकलवरुन रोज सात कि.मी. अंतर कापून शाळेत जायचा. यावर्षी 85% मार्क्स घेऊन दहावीच्या परीक्षेत पास झाला होता. आता अकरावीसाठी कॉलेजला प्रवेश घ्यायचा होता. त्याकरिता दोन हजार रुपये कॉलेजमध्ये भरायचे होते. एकरकमी एवढी रक्कम आणायची कुठून याची गेल्या पंधरा दिवसापासून नेमलालजींना काळजी लागली होती. आजही पैशाचा प्रश्न सुटलाच नव्हता. जर पैशाची सोय झालीच नाही तर? हा विचार नुसता मनात येताच त्यांचा जीव कासाविस झाला. मनोजचा उतरलेला चेहरा डोळ्यापुढे दिसू लागला. किती स्वप्ने पाहिली होती मनोजने ! त्याला खूप शिकायचे होते, डॉक्टर व्हायचे होते. त्याच्यावर सरस्वती प्रसन्न होती पण लक्ष्मीची साथ नव्हती. नेमलालजी आणि मनोरमाबाई मनोजच्या उज्वल भविष्याच्या आशेवरच हा कष्टाचा आणि ओढग्रस्तीचा संसार ओढत होते.

नेमलालजींनी मनातले सगळे विचार झटकले, आणि आपल्या मनाला समजावू लागले. निघेलच काहीतरी मार्ग ! दिवसभराच्या

श्रमाने थकलेल्या नेमलालजींना निद्रादेवीने केव्हा कवेत घेतले हे त्यांनाही कळले नाही. मनोज मात्र रात्रीपर्यंत जागत अभ्यास करीत होता.

संस्थानच्या चौकीदाराने सकाळचे पाचचे टोल दिले आणि धर्मशाळेतील लाऊडस्पीकर वरुन मंजूळ स्वर घुमू लागले.

'णमो अरिहंताणं
णमो सिद्धाणं'

त्या पंचनमस्कार मंत्राच्या स्मरणाने हळूहळू धर्मशाळेला जाग येऊ लागली. नेमलालजी पण उठलेच. या तीर्थक्षेत्रावर मुनीम म्हणून काम करीत असल्यामुळे आलेल्या सर्व यात्रेकरुंची गरम पाण्यापासून तर चहा जेवणाची सोय त्यांनाच पहावी लागे. आपल्या बिछान्यातून उठून ते खोलीच्या बाहेरील पडवीत आले. नुकतेच कुठे उजाडू लागले होते. त्या किंचित प्रकाशात धर्मशाळेतील मंदिर स्वप्नवत भासत होते. नेमलालजींनी रोजच्या सवयीप्रमाणे मंदिराकडे बघून हात जोडले आणि यात्रेकरुंच्या स्नानाची व्यवस्था झाली की नाही हे बघायला निघाले.

धर्मशाळेतील मोठ्या चुलाण्यावर गरम पाण्याची कढई तापत होती. आंघोळी करता करताच यात्रेकरुंनी चहाची ऑर्डर दिली. नेमलालजींनी आपल्या खोलीत येऊन मनोरमाबाईंना पंधरावीस कप चहा बनवायला सांगितले. नेमलालजींनी त्यांचे प्रातःविधी भराभर आटोपले. दांडीवरचे केशरी धोतर ते नेसले. केशरी दुपट्टा पांघरला आणि धर्मशाळेतील मंदिराकडे ते चालू लागले.

नेमलालजी गाभाऱ्यात पोचले आणि समोरची महावीरस्वामींची कमलासनस्थ, पांढरीशुभ्र, प्रसन्न मूर्ती नजरेस पडताच ते त्यांच्या सगळ्या काळज्या, चिंता विसरले. सतत चाळीस वर्षे संस्थानच्या सेवेत असलेल्या नेमलालजींची प्रत्येक सकाळ त्या पवित्र मूर्तीच्या दर्शनाने पूनीत होत होती. अनिमिष नेत्रांनी ते एकटक त्या मूर्तीकडे बघत होते. त्या मूर्तीच्या दर्शनाने नेमलालजींना रोजच्यासारखाच परमशांतीचा अनुभव आला. ते सुरेल आवाजात गाऊ लागले.

''संतप्त मानस शांत हो
जिनके गुणोंके गान में
वे वर्धमान महान जिन,
विचरे हमारे ध्यान में''

त्यांच्या गंभीर आवाजाने गाभारा निनादून गेला. पुजाऱ्याने नेहमीप्रमाणे अभिषेक, अष्टक, आरती आटोपून आशीर्वादासाठी निरांजनाचे तबक नेमलालजींसमोर धरले.

''श्री जिनवर की आशिका
लिजे शिष चढाय
भव भव के पातक कटे,
सब दुख दूर हो जाय''

शेवटचे चरण म्हणताच नेमलालजींच्या डोळ्यासमोर मनोजचा चेहरा उभा राहिला. आणि आतापर्यंतची त्यांच्या मनाची शांती, प्रसन्नता भंग पावली. पैशाच्या विचाराने त्यांचे अंतरंग ढवळून निघाले. मंदिरातून निघताना परत एकदा त्यांनी महावीरांच्या मूर्तीला नमस्कार केला. आणि त्यांच्याही नकळत मनात प्रश्न उमटलाच.

'आज तरी मिळेल कोणी दाता? होईल पैशाची सोय?'

दुसऱ्याच क्षणी नेमलालजींना स्वतःच्या विचारांची लाज वाटली. या वीतराग मूर्तीचे दर्शन घेताना ही इच्छा व्हावी. गत चाळीस वर्षापासूनची निष्ठा, सम्यक श्रद्धा डळमळीत होत असल्याची जाणीव त्यांना झाली आणि ते तसेच स्वतःच्या मनाला धिक्कारत मंदिराबाहेर पडले.

●●●

या सिद्धभूमीवर धर्मशाळेच्या जवळच असलेल्या छोट्याशा पहाडावर प्राचीन जिनचैत्यालये होती. गर्द हिरव्या वनराईने नटलेले डोंगर, त्या डोंगराच्या कुशीतून खळाळत कोसळणारा फेनधवल जलप्रपात, हिरव्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारी शिखरबद्ध, सुबक पांढरी शुभ्र जिनचैत्यालये, त्या मंदिरापर्यंत जाणाऱ्या गुलाबी दगडांनी बांधून काढलेल्या पायऱ्या यामुळे दर्शनार्थींना वंदनेचा शीण जाणवतच नसे. वंदना करुन उतरताना डोंगराच्या पायथ्याशी वाहणाऱ्या नदीतील थंडगार पाण्यात पाय बुडवले की वाटणारा थकवा पार नाहीसा होई !

नागपूरवरुन आलेल्या कालच्या यात्रेकरुंची वंदना, पूजा आनंदाने पार पडली होती. या तीर्थक्षेत्राचे स्वर्गीय वातावरण, धर्मशाळेतील स्वच्छता, येथील कर्मचाऱ्यांचे आदरपूर्ण आगतस्वागत त्यामुळे यात्रेकरुंचीही मने सुखावली होती. जेवणे खाणे आटोपताच त्यांनी सामानाची बांधाबांध केली. त्यांच्यातील काही पुरूष वर्ग कार्यालयात दानराशी मांडत होता.

या सिद्धक्षेत्रावर एक खूप भव्य जिनमंदिर आकार घेत होते. चोविस तीर्थंकरांच्या भव्य प्रतिमा, खास जयपूरवरुन आणून त्यात विराजमान होणार होत्या. या मंदिराच्या बांधकामासाठी निधी गोळा करण्याचे आवाहन करणारी पत्रके लटकत होती. याशिवाय क्षेत्रविकासाच्या विविध योजनांसाठी पैशाची आवश्यकता होती.

नेमलालजींनी यात्रेकरुंना सगळ्या योजना समजावून सांगितल्या. यात्रेकरुंनी सांगितलेल्या मोठमोठ्या रकमांच्या पावत्या फाडताना त्यांचे हात थरथरत होते. डोळ्यावर पाण्याचा पडदा जमल्यासारखे वाटत होते.खरे तर यापैकी अगदी थोड्या रकमेची त्यांना गरज होती. पण तेवढीही रक्कम मिळण्याची आशा नव्हती.

... आपली पैशाची गरज त्यांनी सिद्धक्षेत्राच्या अध्यक्षांजवळ देखील बोलून दाखविली होती. नेमलालजी कर्जरुपाने पैशाची याचना करीत होते. पण व्यवस्थापकांनी त्यांची निराशाच केली होती.

“शिकून काय दिवे लावणार आहे तो? त्यापेक्षा नवीन मंदिराच्या बांधकामावर लक्ष द्यायला द्या पाठवून त्याला उद्यापासून ! चार पैसे मिळाले तर कामी येतील तेवढेच खर्चापाण्याला !”

असे मगरुर उत्तर मिळाले होते. आणि संस्थानकडून काही पैसे मिळतील ही आशा मावळली होती.

खूपदा नेमलालजींच्या मनात येई, एखाद्या दानशूर जिनेंद्रभक्ताजवळ करावी का पैशासाठी याचना? पण दुसऱ्याच क्षणी ते आपल्या मनाला समजावत ! कोणी आपल्याला समजून घेतले तर ठीक ! नाहीतर आहे ही नोकरीही जाण्याची वेळ येईल. पण नेमलालजी तो विचारही आपल्या मनातून काढून टाकू शकत नसत. मनोजचे भविष्य, त्याची सगळी स्वप्नं आणि मनोरमाबाईंच्या सगळ्या आशा त्या पैशाभोवती केंद्रीत झाल्या होत्या.

●●●

आज यात्रेकरुंची खूपच गर्दी होती. खरे तर सकाळी लवकर उठून त्यांच्या व्यवस्थेला लागणे जरुरीचे होते. पण नेमलालजी आज लवकर उठलेच नाहीत. उठावेसे वाटत नव्हते त्यांना ! मनाची सगळी उभारी गळून पडल्यासारखी झाली होती.

कॉलेजमधील प्रवेशाची शेवटची तारीख काल उलटून गेली होती. गेल्या कित्येक वर्षांचा नेमलालजींचा पहाटे उठून देवदर्शनाचा नेम आज चुकला होता. डोळे बंद करुन ते अंथरुणावर पडून राहिले.

नेमलालजींची मनःस्थिती मनोजने जाणली. गरीबी माणसाला खूप लवकर शहाणे करते.

मनोजने आपली सगळी पुस्तके व्यवस्थित रचून कपाटावर ठेवली. सहजच त्याच्या मनात विचार आला, ‘आता अभ्यास तरी कशाला करायचा?’ तो तयार होऊन निघाला.

“आई ! बाबांना झोपू दे. मी जातो आज कार्यालयात !”

मनोरमाबाईंनी गुडघ्यात तोंड लपविले. त्या काहीच बोलल्या नाही. अतीव निराशेने त्या घराचे शब्द जणू गोठले होते.

मनोज कार्यालयात येऊन बसला. यात्रेकरुंचे जाणे येणे, राहणाऱ्यांची, जेवणा खाण्याची व्यवस्था, वंदनेची व्यवस्था यात भराभर वेळ गेला. दुपारनंतर नेमलालजी पण कार्यालयात मनोजच्या बाजूला येऊन बसले.

कालपासून मुंबईचे यात्रेकरु आलेले होते. आज त्यांची वंदना, देवदर्शन, जेवणे आटोपून निघण्याची तयारी सुरु होती.

नवीनचंद्र आणि पुष्करसेठ, या दोघांचेही मुंबईत स्वतंत्र व्यवसाय होते. पुण्योदयाने दोघेही अमाप कमवत होते. कोठेही यात्रेला निघताना दोघेही सोबतच निघत. बालपणापासूनची मैत्री होती त्यांची !

पुष्करसेठ आणि नवीनचंद्र दोघेही कार्यालयात येऊन बसले. पुष्करसेठने त्यांच्या वडीलांच्या स्मरणार्थ एका मोठ्या रकमेचा चेक फाडला. त्या पैशातून नूतन मंदिरासाठी आदिनाथ भगवंतांची विशाल प्रतिमा घडविण्यात येणार होती.

“सेठ, आपणही काही रक्कम मांडा ! सिद्धक्षेत्रावर पुण्यकर्माचा योग वारंवार येत नाही.” नेमलालजी नेहमीच्या सवयीप्रमाणे अजिजीने नवीनचंद्रांना उद्देशून बोलले.

“अरे यार ! इथे तर खोल तुझा बटवा जरा” पुष्करसेठ हसून नवीनचंद्रांना म्हणाले.

“मुर्ती घडविणे, मंदिर बांधणे हे काम तुझे ! तुला तर माहितच आहे हे असे निर्जीव शिल्प घडविण्याची मला काही आवड नाही. मी घडवितो ते सजीव शिल्प ! माझ्या मदतीने जेव्हा मानवी चेहऱ्यावर स्मित फुलते तेच माझ्या दृष्टीने अप्रतिम शिल्प !”

पुष्करसेठ यावर काहीच बोलले नाही. या एकाच मुद्यावर त्या दोघांचे कधी एकमत होत नसे. त्यांची मूळ विचारप्रणालीच भिन्न होती नं !

मनोजने त्याच्या सुंदर अक्षरात पावती लिहून पुष्करसेठच्या हातावर ठेवली.

“काय मोत्यासारखे सुंदर अक्षर आहे !” पुष्करसेठ उद्गारले.

मनोजच्या पोरगेलेशा मूर्तीकडे बघून नवीनचंद्र म्हणाले,

''शाळेत नाही जात तू?''

नवीनचंद्रांच्या प्रश्नाने जणू मनोजच्या वर्मावरच बोट ठेवले. आतापर्यंत आणलेला समजदारीचा आव एकदम गळून पडला आणि मनोज ढसाढसा रडायलाच लागला.

मनोजची ती अवस्था पाहून नेमलालजींनाही गहिवरून आले. त्याच्यावर मायेने हात फिरवित ते बोलू लागले,

''जात होता सेठ शाळेत ! खूप हुषार आहे. शिकण्याची खूप इच्छाही आहे. पण... ! गरीबांच्या पोरांना स्वप्नही त्यांना झेपतील अशीच पहावी लागतात ! खूप चांगले मार्क्स घेऊन यंदाच मॅट्रीक पास झाला आहे. पण..

''पुढे शिकण्यासाठी पैसा नाही ! खरे ना?'' पुष्करसेठने विचारले.

नेमलालजींनी मुकपणे आपले अश्रू पुसले. पुष्करसेठ भावनाविवशतेने बोलले,

''नवीन तुला हवे ते सजीव शिल्प सापडले बघ !'' नवीनचंद्र मनोजकडे बघून म्हणाले.

''मी मदत केली तर शिकशील तू?''

मनोजच्या चेहऱ्यावर स्मितरेषा फुलल्या. त्यातच नवीनचंद्रांच्या प्रश्नाचे उत्तर होते.

●●●

पुष्करसेठ आणि नवीनचंद्र जायला निघाले तेव्हा मनोज आणि नेमलालजी साश्रू नयनाने गाडीपाशी उभे होते. मनोज नम्रपणे वाकून नवीनचंद्रांना नमस्कार करीत होते. कृतज्ञता व्यक्त करायला नेमलालजींजवळ शब्द नव्हते. पण त्यांच्या डोळ्यातील आसवे नवीनचंद्रांना कृतज्ञतेची पावती देत होते.

नवीनचंद्र अतीव समाधानाने गाडीत बसले. मनोजला महिनावार शिष्यवृत्ती पाठविण्याचे आश्वासन देऊन त्यांनी त्याचे जीवन घडविण्याचे ठरविले होते. अकरावीला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम त्यांनी एकरकमी दिली होती.

नवीनचंद्रांना घेऊन जाणारी गाडी एक वळण घेऊन दृष्टीआड झाली. नेमलालजींनी मागे वळून मंदिराकडे तोंड केले आणि मिटल्या डोळ्यासमोर तरळणाऱ्या महावीरांच्या प्रतिमेला मनोमन नमस्कार केला.

●●●

**सौ. मीना किरणकुमार गरीबे,**
''स्वस्तिक''
शिवनेरी सहनिवास, विजय हाऊसिंग सोसायटी,
गौरक्षण रोड, अकोला 444 004, (महाराष्ट्र)
फोन नं. (0724) 2458157
Mobile 9422862888